# बालमजुरी एक समस्या

**सहा. प्रा. गीता एफ. पारसे**
समाजशास्त्र विभाग
कला वाणिज्य महाविद्यालय पाटणसावंगी
Email Id- gargeeta41@gamil.com
Mob.No. 9075087028

---

***सारांश :***

*बालमजुरी हे एक जागतिक समस्या आहे जी प्रामुख्याने ज्या देशांमध्ये सामाजिक आणि आर्थिक स्थिती आणि आर्थिक संसाधने कमी आढळते त्या देशांमध्ये बालमजुरी मोठ्या प्रमाणात दिसून येते. सामाजिक आणि आर्थिक कौटुंबिक गरिबी, पालकांचे कमी उत्पन्न, अक्षांपणा, आजारपणा, सामाजिक सुरक्षा आणि संरक्षणाचा अभाव आणि शिक्षणाच्या मूल्याबद्दल अज्ञान किंवा मर्यादितता यामुळे बालकामगारांमध्ये असंख्य वाढ झालेली दिसून येते. बालमजुरी ही कोणत्याही देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात अडथळा निर्माण करता जागतिक अंदाजानुसार 152 दशलक्ष त्यामध्ये 64 दशलक्ष मुली आणि 88 दशलक्ष मुले काम करत आहे. सध्या कोविड-19 च्या प्रभावामुळे कामगार वर्गाच्या राहणीमानाने फार मोठा प्रभाव पडलेला आहे. कारण वडिलांची आर्थिक परिस्थिती शिक्षण नसणे त्यामुळे वडील आपल्या सोबत आपल्या मुलांना सुद्धा कामावर घेऊन जात असतो किंवा त्यांना बालमजुरीच्या परिस्थितीत ढकलले जाऊ शकते. भारतात बालमजुरांची संख्या इतर देशापेक्षा जास्त प्रमाणात आढळून येते. सुमारे एक कोटी मुले सक्रियपणे कामात गुंतलेली असतात किंवा काम शोधत असतात. आज जवळजवळ भारतामध्ये दर 10 मुलामागे 1 मुलगा हा बालमजूर आहे आणि त्यांचे सर्व आयुष्य मजुरी करण्यातच जाणार आहे ही भावना त्यांच्यामध्ये रुजवत आहे.*

**मुख्य शब्द :** बालमजुरी, गरीब पालक, उत्पन्न, कोविड-19

---

**प्रस्तावना** :

बालपण हे निराग आणि शिकण्याचा काळ म्हणून सर्वत्र ओळखले जाते तथापि जगभरातील लाखो मुलांसाठी बालकामगाराच्या कठोर वास्तव्यामुळे हे रमणीय दृश्य भंग पावते. बालकामगार मुलांना योग्य शिक्षण आणि संगोपनाच्या वातावरणापासून वंचित ठेवत नाही तर त्यांना धोकादायक आणि मानसिक परिणाम होऊ शकतात. या जागतिक संकटाला प्रतिसाद म्हणून जगभरातील राजांनी मुलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी विविध बालकामगार कायदे आणि उपक्रम लागू केले आहेत. हा लेख बालकामगार कायद्याची महत्त्व आणि बाल हक्काच्या व्यापक चौकटीच्या शोध घेतो. जगातील सर्वात तरुण लोकसंख्येसाठी चांगले भविष्य घडल्यावर त्याचा प्रभाव तपासतो. बालकामगार याचे मूळ कारण दारिद्र्यात असल्याचे दिसून येते. सामाजिक दृष्ट्या वंचित व गरीब कुटुंबातील मुले बालमजुरीकडे जोडली जातात. ज्या ज्या कुटुंबातील व्यक्तीचे उत्पन्न कमी आहे अशा

कुटुंबातील पालकांची अशी अपेक्षा असते की, आपल्या मुलांनी शाळेत जाण्याऐवजी आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत शोधावा किंबहुना घरात दररोज काही प्रमाणात का होईना पैसे आणावेत त्याचबरोबर सध्या बालमजुरास बाजारात मोठी मागणी आहे कारण बालमजुराकडून कमी मोबदल्यात जास्त श्रम करून घेतल्या जाते येतात त्यातून व्यावसायिकांना अधिक नफा शिल्लक राहतो. सामान्य उत्पादकतेवर मालकांचे समाधान होत नाही. त्यामुळे मालक वर्ग बालमजुरांकडून जास्त काम करून घेतात. या क्षेत्रातील बालमजूर काढून घेतले तर या व्यवसायात काम करणाऱ्या मजुरांना अधिक मोबदला द्यावा लागेल त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होईल.

**बालमजुरीची व्याख्या :**

बालकामगार म्हणजे १४ वर्षाखालील मुले ज्यांना कामावर जावे लागते, ज्यामुळे त्यांचे शिक्षण आणि योग्य विकास होऊ शकत नाही.

बालकामगाराच्या समस्येबाबत उपाययोजना करण्यात यावी बालकामगार म्हणजे बालकांच्या कुवती पेक्षा त्यांना अधिक काम करावे लागते. अल्पवयात केलेल्या कामामुळे त्यांच्या शिक्षणात बाधा निर्माण होऊन त्यांच्या आटोक्याच्या बाबतीत समस्या निर्माण होतात. त्यामुळे त्यांच्या जीविताला धोका निर्माण होतो.

**उद्देश्य :**

1. भारतातील बालकामगार प्रथेच्या विविध दुष्परिणामांचा अभ्यास करणे.
2. भारतातील बालकामगार प्रथाचे निर्मूलन करण्यासाठी उपाय योजना सुचविणे.
3. बालमजुरीस काणीभूत असणाऱ्या कारणांचा शोध घेणे.
4. बालमजूर ही संकल्पना समजावून घेणे.

**बाल कामगारांचे वर्गीकरण :**

**1. बालकामगार :**

विविध, कंपन्या, कार्यशाळा, आस्थापना, विभाग, विविध प्रकारच्या सेवा क्षेत्रात मोबदला घेऊन किंवा विना मोबदला काय काम करनारी बालकांचा समावेश बालकामगार या वर्गामध्ये होतो.

**2. दास्तातील पालके :**

पैशाकरिता पालक अनेक वेळेस आपल्या बालकांना गहाण टाकतात ही बालके आपल्या वडिलांची कर्जे वारसा हक्काने फेडण्यासाठी विना मोबदला काम करतात त्यास दास्य बालके असे म्हणतात. भारतातील काही दुर्बल मागासलेल्या घटक राज्यांमध्ये ही प्रथा आहे ही आणि खूपच गंभीर परिस्थिती असून अशा पद्धतीने काम करणाऱ्या बालकांपर्यंत पोहोचणे प्रशासनाच्या दृष्टीने अवघड बाब आहे.

**3. घरकाम/कौटुंबिक कामे करणारी बालके :**

आर्थिक मोबदला घेऊन अथवा न घेता केवळ अन्न मिळवण्यासाठी बालके असे म्हणतात .उदा. अनेक

शहरांमध्ये अशा प्रकारची बालके एखाद्या मजुराप्रमाणे वर्षानुवर्षी कुटुंबामध्ये काम करतात. त्यांच्या कामाचे स्वरूपही वेगवेगळे असते.

**4. फुटपाथ वरील बालके :**

या प्रकारातील बालके रस्त्यावर श्रम करून (बूट पॉलिश करून, वर्तमानपत्रे विकून, भंगार गोळा करणे) त्याचप्रमाणे भीक मागून रस्त्याच्या कडेला राहतात. त्यांना निवाऱ्याची कोणतीही सोय नसते. या प्रकारातील बालके गंभीर स्वरूपाच्या गुन्हा मध्ये सापडतात. कारण पैशासाठी ही बाल गुन्हेगार झाल्याची अनेक उदा. उदाहरणे सापडतात स्थलांतरित बालके-उपजीविकेच्या शोधार्थ अनेक कुटुंब एका शहरातून दुसऱ्या शहरात; एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत राहतात. त्यांच्याबरोबर त्यांच्या बालकांनाही फिरावे लागते. त्यामुळे या बालकांच्या शिक्षणावर परिणाम होतो. स्थलांतरित बालके वेगवेगळ्या प्रकारची मिळतील ती कामे करून उपजीविका चालवतात. अशा प्रकारच्या बालमजुरीच्या माध्यमातून बालके गुन्हेगारीकडे वळतात बालमजुरीच्या माध्यमातून अनेक बालके सामाजिक कौटुंबिक संस्कारापासून दूर राहिल्यामुळे त्यातील काही बालके व्यसनाधीनतेकडे वळतात. त्यांना बाल गुन्हेगार म्हणतात. उदा. लहान- लहान चोऱ्या करणे, मोठ्या दरोड्यामध्ये सहभागी होणे, खून करणे, अशा प्रकारचे वर्तनही बाल गुन्हेगारांकडून होते ज्या प्रमाणात बालमजुरीत वाढ होत जाते त्याच प्रमाणात बाल गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ होताना दिसून येते. भारतात बालमजुरी आटोक्यात आणण्यासाठी तिचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन स्तरावरील विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहे.

**बालमजुरांना कोविड-19 ची परिस्थिती कशी ठरली :**

कोविड-19 च्या काळामध्ये ज्याप्रमाणे सर्वांना नियम किंवा अटी लागू होते तसेच त्या काळामध्ये व्यक्ती ही एकमेकांच्या घरी तर जायची नाही पण काही लोकांच्या नोकऱ्या सुद्धा थांबल्या होत्या असेही म्हणता येईल म्हणजेच ही कोरोनाची परिस्थिती आपल्याला घातक होती संसर्गजन्य अशा प्रकारचा हा रोग होता. म्हणजेच एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या संपर्कात आला की तो व्यक्ती तो व्यक्ती सुद्धा संसर्गजन्य होत होता म्हणजेच हा वरच असा होता की एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे लवकरात लवकर प्रतिसाद करत होता त्यामुळे एकमेकांची डिस्टन्स ठेवणे हे ते गरजेचे ठरले होते म्हणून यामुळे त्या लोकांना त्यांच्या नोकऱ्या जॉब काम व्यवसाय इत्यादी कामधंदे बंद असल्यामुळे त्यांना घरीच राहावे लागत होते म्हणजेच ज्या व्यक्तींना व्यवसाय असूनही कोरोना काळात त्यांना घरीच राहून आपले काम करावे लागत होते. ज्याप्रमाणे व्यवसाय, जॉब, व्यवसाय, इत्यादी कामे असून सुद्धा त्यांना हा त्रास सहन करावा लागला त्याचप्रमाणे त्या काळात बालमजुरांनाही खूप त्रास सहन करून त्यांच्यावर अजूनही शोषण सुरू होते, या साथीच्या आजाराने भारतातील मुलांना शाळा सोडण्यास भाग पडले .

भारतातील आजची परिस्थिती अशी आहे की कोविड-19 च्या परिस्थितीमुळे अनेक देशा देशांमध्ये सर्वांना अनेक प्रकारच्या येणाऱ्या अडचणी , किंवा त्या काळात त्यांना होणारा त्रास सहन करावा लागला. त्यामुळे याचा बालमजुरांना खूप त्रास होत गेला. ज्यावेळी कोविड-19 चे लॉकडाऊन लागले होते त्यावेळेस त्या बालमजुरांचे शोषण होत होते. कोरोना व्हायरस हा गुप्तपणे शेतात आणि कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी स्थलांतरित करण्यात आले. तसे करण्यात आल्यामुळे त्या बालकामगारांची समस्या किंवा त्यांच्या अडचणी बिकट झाल्या. मार्चमध्ये (25 मार्च 2020) रोजी राष्ट्रीय लोकडाऊन लागू झाले. बालमजूरेशी संबंधित 2473

हस्तक्षेप झालेले एप्रिलमध्ये 446 पर्यंत घसरले. परंतु लॉकडाऊन निर्बंध स्थितीत झाल्यानंतर वाढु लागले. मे महिन्यात 734 पर्यंत पोहोचले. तथापि, ही घसरण काम करणाऱ्या मुलांची प्रत्यक्ष संख्या दर्शवत नाही. फक्त ओळखल्या गेलेल्या मुलांची अशा प्रकारे कमी संख्या केवळ साथीच्या आजारामुळे झालेल्या सामान्य अहवाल प्रक्रियातील व्यत्यय आणि प्रकरणाच्या तपासाचे प्रतिबिंब दर्शवू शकते. त्यामुळे लॉकडाऊन लागल्यामुळे अनेक व्यक्तींना अडचणी येत गेल्या आणि अनेक व्यक्तींचे काम थांबले तरीही बाळ मुजरांचे शोषण हे चालूच होते.

**बाल कामगारांची उपाय योजना:**

- **शिक्षण :** मुला- मुलींना शाळेत जाण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि शिक्षणाला आवश्यक बनवणे. दारिद्र्य कमी करणे: - गरिबी कमी करण्यासाठी योजना करणे आणि लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे.
- **कायद्याची अंमलबजावणी :** बालकामगारावर कठोर कायदे करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे.
- **जागरूकता** : बालकामगार यांच्या समस्येबद्दल समाजात जागरूकता वाढवणे.
- **सामाजिक बदल :** समाजातील चुकीच्या कल्पना आणि दृष्टिकोन बदलणे, जेणेकरून बालकामगारांना प्रोत्साहन मिळत नाही.

**निष्कर्ष :**

बालमजुरी कायदे आणि बाल हक्क उपक्रम अशा जगाला घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात जिथे प्रत्येक मुलाला बालपण, शिक्षण आणि सुरक्षित वातावरणाचा अधिकार मिळू शकेल, जगाच्या अनेक भागांमध्ये प्रगती झाली असली तरी, आव्हाने कायम आहेत त्यासाठी बालमजुरीची मूळ कारणे दूर करण्यासाठी कायदे लागू करण्यासाठी आणि शिक्षण आणि जागरूकता वाढविण्यासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे. सरकार व्यवसाय, नागरी समाज आणि व्यक्तीची सामूहिक जबाबदारी आहे की अशा भविष्यासाठी काम करावे जिथे कोणत्याही मुलाला शोषणाचा कठोर वास्तवाला सामोरी जावे लागणार नाही. जिथे मुले बालमजुरीच्या साखळ्यांपासून मुक्त होऊन स्वप्न पाहण्यास, शिकण्यास आणि वाढण्यास मुक्त असतील. बालकामगार ही एक गंभीर समस्या आहे, ज्यावर तातडीने उपाय करणे आवश्यक आहे. यासाठी सरकारने, सामाजिक संस्था आणि नागरिकांची एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

- तुकाराम जाधव-मानवी हक्क
- डॉ. पाटील व्ही .बी.-मानवी हक्क
- सुभाष गवळी-ओळख मानवाधिकाराची
- वाघमारे बी. मानव संसाधन विकास व मानवाधिकार
- डॉ. आर आर.के. शेख-बालकामगार समाधान
- WWW.Shodhgangotri.inflibnet.ac.in